**महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण-२००६**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
शासन निर्णय क्र. आयआयआय-पॉलिसी २००६/प्र.क्र.१३४६/उद्योग-२
दिनांक :- १२ फेब्रुवारी, २००७

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण २००१ चा कालावधी मार्च, २००६ मध्ये समाप्त झाल्यामुळे नवीन औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण जाहिर करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

नवीन औद्योगिक धोरणाचा मसूदा तयार करण्यापूर्वी विविध औद्योगिक संघटना, उद्योगांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मा.मंत्री (उद्योग) यांनी महसूली विभागातील औद्योगिक संघटना, उद्योगांचे प्रतिनिधी, उद्योजक, लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर परिषदा आयोजित करुन उद्योग घटकांना येणाऱ्या अडी-अडचणी व शासनाकडून जाणून घेतल्या आहेत. याशिवाय मा.मंत्री (उद्योग) यांनी नियोजन विभाग, वित्त विभाग,विक्रीकर आयुक्त व विविध अधिकार्यांसमवेत चर्चा केली आहे. या पार्श्वभूमिवर नवीन औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडविण्यासाठी व त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नवीन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी व त्याद्वारे रोजगाराच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात येत आहे.

औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ ची उद्दिष्टये खालील माध्यमातून साध्य केली जातील.

- विशेष भर देण्यासाठी महत्वाची क्षेत्रे निश्चित करणे.
- गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधांची उभारणी.
- मनुष्यबळ निर्देशांक कमी असलेल्या १० जिल्ह्यात रोजगाराच्या भरीव संधी निर्माण करण्याकरिता प्रोत्साहने.
- देशांतर्गत तसेच विदेशी विशाल गुंतवणूक आकर्षित करणे.

24 APR 2007
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - RBINA
आवक नं.
18 APR 2007
विशेष नोंद वही नं -
कार्यविवरण नं -

- स्थानिक स्त्रोत व स्थानिक आर्थिक क्षमतांचा वाणिज्यिकदृष्ट्या अधिकतम उपयोग.
- स्पर्धात्मक गुणवत्ता, संशोधन व विकास आणि तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण या माध्यमातून लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचे सक्षमीकरण करणे.
- औद्योगिक समूहांची (Clusters ) देखभाल व विकास करणे.
- उद्योग आजारी पडू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजणे आणि आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन करणे.
- सुलभ निर्गमन (Exit Option) पर्याय उपलब्ध करुन देणे.
- प्रचलित कार्यपध्दतीचे सुलभिकरण करणे, अडथळे दूर करणे आणि उद्योगास अनुकूल वातावरण तयार करणे.
- संस्थागत पाठबळ वृध्दींगत करणे.

**भर देण्यायोग्य क्षेत्रे:-**

ज्या क्षेत्रांना प्राथम्य देणे आवश्यक आहे अशी भर देण्यायोग्य क्षेत्रे खालील प्रमाणे राहतील:-

- पायाभूत सुविधा:- वीज, रस्ते, रेल्वे, दळणवळण, जोडणी, विमानतळे, बंदरे.
- उत्पादन क्षेत्रे :- कृषि आधारीत उद्योग, वस्त्रोद्योग, स्वयंचलित वाहने व वाहनांचे सुटे भाग, इलेक्ट्रॉनिक उत्पादने, औषधी तसेच जेम्स अँड ज्वेलरी.
- सेवा क्षेत्रे: - माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान आधारीत सेवा क्षेत्रे, सेवा तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, रिटेल, पर्यटन व मनोरंजन.
- मुंबई-पुणे-नाशिक-औरंगाबाद या चतुष्कोनाचा विकास करणे व त्यासाठी विशेष हेतू वाहन कंपनी (SPV) स्थापन करणे.
- राज्यातील महत्वाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये वायू वितरणाचे जाळे निर्माण करणे व त्याद्वारे शुध्द व स्वस्त इंधन पुरवठा करणे.

**प्रचालन व आर्थिक प्रोत्साहने:-**

सामूहिक प्रोत्साहन योजनेचे सुलभीकरण करणे धोरणाचा भाग असून यानूसार औद्योगिक घटकाचे भौगोलिक स्थान, उद्योगाचा आकार, रोजगार निर्मिती,गुंतवणूक विचारात घेऊन पात्र होणारी प्रोत्साहने देय होतील. यामध्ये खालील प्रोत्साहनांचा समावेश आहे:-

- औद्योगिक विकास अनुदान, व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्कातून सूट, स्वामित्व धन / अकृषिक शुल्कातून माफी, स्वामित्वधनाचा परतावा.
- जकात कर /जकात कराऐवजी प्रवेश कर परतावा, कच्च्या मालाच्या वापरावर जकात कर आकारणी, प्रोत्साहने.

- अस्तित्वातील लघु व मध्यम उद्योगांना स्पर्धात्मक गुणवत्ता वाढविण्यासाठी विकास व संशोधन आणि तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रोत्साहने.
- 'मानवी विकास निर्देशांक '( H.D.I. ) कमी असलेल्या जिल्ह्यात स्थापन होणाऱ्या उद्योगांना
- विशेष प्रोत्साहन म्हणून त्यांनी राज्य कामगार विमा योजनेस व कर्मचारी भविष्य निर्वाह निधीस दिलेल्या अंशदानाच्या ७५ टक्के एवढा परतावा.
- विशाल प्रकल्पांना एकत्रित प्रोत्साहने ( Customized Incentives ).
- औद्योगिक विकास निधी स्थापन करणे.
- बीज भांडवल योजनेत सुधारणा करणे.

**इतर प्रोत्साहने / उपाय योजना :-**

उत्पादनाची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी सामूहिक दृष्टीकोन (Cluster Development) स्वीकारणे, उद्योगांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन पायाभूत सुविधा निर्माण करणे, कमाल उपयोगिता आणि सार्वजनिक सुविधा पुरविणे, कुशल गुणवत्ता आकर्षित करणे आणि मनुष्य बळाची आवश्यकता असलेले उद्योग आणि उच्च स्वयंचलित उद्योग हे एकमेकांपासून वेगळे करणे. आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन आणि निर्गमन (Exit) योजना.

- नवीन औद्योगिक वसाहती/संकूल.
- विशेष आर्थिक क्षेत्र.
- खादी व ग्रामोद्योगांना पणन सहाय्य उपलब्ध करुन देणे.
- आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रे स्थापन करणे.
- स्त्रोतांचे आरेखन आणि राज्याची क्षमता प्रदर्शित करणे.
- बदलत्या तांत्रिक आणि मनुष्य बळ गरजा विचारात घेऊन कामगार जगत माहिती कक्ष (Labour Market Information Cell ), सेवा प्रशिक्षण संस्था (Service Training Institute ) आणि कामगारांची क्षमता आणि परिणामकारकता वाढविण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांची पुनर्रचना करणे.कामगार कायदे व कार्यपध्दती यामध्ये सुधारणा करणे.
- नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी लागणारे परवाने /अनुज्ञप्ती घेण्यासाठी येणारा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने त्यांचे एकखिडकी योजनेद्वारे सुसुत्रिकरण व सुलभिकरण करणे.
- प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस चालना देणे.
- उद्योग विभागाची पुनर्रचना करणे.

H 2040-2

**कालावधी :-**

औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ चा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

छाया अग्निहोत्री

( छाया अग्निहोत्री )
कक्ष अधिकारी

प्रति,

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव